विशेष खटला ए.सी.बी. कं. 3/2014.
सर. वि. बालुसिंग.
नि. 38

सर. पक्षातर्फे साक्षीदार कं. 2 ची साक्ष.

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | :— | इकबाल हुसेन तजम्मुल हुसेन |
| वय | :— | 52 वर्षे, |
| व्यवसाय | :— | लिपीक महानगर पालीका अकोला. |
| रा. | :— | खैर मोहम्मद प्लॉट, अकोला जि. अकोला. |

सर—तपास — सर. पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.रेलकर.

1. दि. 25.07.2013 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पत्र आल्यामुळे अकोला महानगरपालीकेने मला व श्री गायकवाड यांना पंच म्हणून काम करण्यासाठी ॲन्टीकरप्शन ब्युरोच्या कार्यालयात पाठविले. सहायक आयुक्त यांनी मला आदेश दिला होता. मी सकाळी 9.00 वाजता ए.सी.बी. कार्यालयात गेलो. पंच म्हणून काम करण्यासाठी आदेश आदल्या दिवशी दुपारी प्राप्त झाला होता. ए.सी.बी. कार्यालयात आम्ही कंकाळ साहेबांना भेटलो. मी व गायकवाड यांनी स्वतःचा परिचय दिला. त्यांनी तकारदार व त्यांच्या कार्यालयातील कर्मचा—यांचा आम्हाला परिचय करुन दिला. तालेवार खान यांची तकार मला व श्री गायकवाड यांना वाचण्यास सांगितले. आम्ही ती वाचली.

प्रश्न : तकारीतला थोडक्यात मजकुर सांगा ?

उत्तर : तकारदाराच्या शेतात अनेक जनावरे घुसली व नुकसान केले म्हणून त्यांनी 64 जनावरांना शासकीय कोंडवाडयात जमा केले होते. त्याची त्यांनी पोचपावती घेतली. काही लोकांनी तालेवार खान विरुध्द तकार केली होती. त्या तकारीतून तालेवार खानचे नाव बाहेर काढायचे म्हणून पोलीस राठोड यांनी तालेवार खानकडून पैसे मागितले. तालेवार खान पैसे दयायला तयार नव्हता असे देखील त्यात लिहिले होते.

2. सदर तकार वाचल्यानंतर मी व श्री गायकवाड यांनी त्यावर सहया केल्या. मला

नि.क. 29 ची लेखी तकार दाखविण्यात आली आहे, त्यावर माझी सही असून श्री गायकवाड यांची देखील सही आहे.

3. राठोड यांनी 5000/– रुपये घेतले होते असे तकारीत लिहिलेले होते. मी पंच क. 1 राहील व गायकवाड पंच क. 2 राहतील असे आम्हाला सांगण्यात आले. मी तकारदारासोबत राहायचे असे मला सांगण्यात आले. तालेवार खान यांला सांगण्यात आले की, त्याने पोलीस ठाण्यात जावून आरोपीस भेटावे व सांगावे की, आज त्याच्याकडे पैसे नाहीत व तो पैशाची सोय करुन पैसे आणून देईन. असे देखील सांगण्यात आले की, त्याच्या खिशात व्हाईस रेकार्डर ठेवल्या जाईल व संभाषण व्हाईस रेकार्डरमध्ये रेकॉर्ड करायचे. मला सांगण्यात आले की, मी पूर्णवेळ तालेवारखान सोबत राहायचे व होणा–या संपूर्ण घटनेवर निट लक्ष ठेवायचे. आरोपी हजर आहे कि नाही हे बघायचे. आम्हाला रेकॉर्डर कसे काम करते ते समजावून सांगण्यात आले. त्याचे प्रात्य क्षीक करुन दाखविण्यात आले. नवीन मेमरीचीप त्यामध्ये टाकण्यात आली व ते रेकार्डर तालेवार खान याचे शर्टाच्या खिशात ठेवण्यात आले. मी व तालेवार खान सकाळी 9.30 वाजता आरोपीकडे जाण्यासाठी ए.सी.बी. ऑफीस मधून निघालो. आम्ही माझे मोटारसायकलवर गेलो व कंकाळ साहेब, त्यांचे कर्मचारी व पंच क.2 आमच्या मागून आले. आम्ही पाउणतासात पिंजरला पोहोचलो. राउत साहेबांनी तालेवार खानच्या खिशात व्हाईस रेकार्डर ठेवले. पोलीस स्टेशनला पोहोचण्याआधी व्हाईस रेकार्डर ठेवण्यात आले. पिंजर पोलीस ठाण्याजवळ गेल्यावर माझे मोबाईलवरुन आरोपी राठोड साहेबांना फोन केला. ते म्हणाले की, आज मी सुटीवर आहे, उदया या. आम्ही ए.सी.बी. कार्यालयात परत आलो. दुस–या दिवशी मी पुन्हा अकोला ए.सी.बी. कार्यालयात गेलो. आम्ही पुन्हा आदल्या दिवशी प्रमाणेच सकाळी 9.30 वाजेच्या सुमारास पिंजरला जाण्यासाठी निघालो. आम्ही सकाळी 10 ते 10.30 वाजेच्या सुमारास पिंजर पोलीस ठाण्याजवळ पोहोचलो. तकारदार यांच्या शर्टच्या खिशात पुन्हा व्हाइस रेकार्डर ठेवण्यात आले. मी व तकारदार पोलीस ठाण्यात गेलो. परंतु आरोपी राठोड भेटले नाही. म्हणून मी पुन्हा आरोपी राठोड यांना फोन केला. आरोपीने तालेवारखानशी फोनवर बोलणे केले. तालेवार खान त्यांना म्हणाला की मी पैसे घेवून पोलीस ठाण्यात आलेलो आहे. त्यादिवशी देखील आम्हाला आरोपी भेटला नाही. आम्ही सायंकाळी 4.00 वाजेपावेतो पिंजर पोलीस ठाण्याजवळ थांबलो होतो परंतु आरोपी आला नाही. आम्ही ए.सी.बी. कार्यालयात परतलो. आमच्या तेथे सहया घेण्यात आल्या. मी तिथून घरी गेलो.

<u>सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंती वरून सर–तपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.</u>

समक्ष,

(विवेक बी. गव्हाणे)

दि. 02.05.2023.

अति. सत्र न्यायाधिश, अकोला.

विशेष लाचलुचपत खटला क्र. ०३/२०१४
सरकार .वि..बालुसिंग राठोड
नि. क्र. ३८ वर सुरु...

<u>**दिनाक ३०.०३.२०२६**</u>

नांव : इकबाल हुसैन तजम्मुल हुसैन

<u>**शपथेवर अभियोग पक्षाकरीता सरतपासणी श्री.अनोकार सहाय्यक सरकारी अभियोक्ता कडून**</u>

४. दिनांक २५.०७.२०१३ रोजी पडताळणीपुर्व पंचनामा मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला <u>**नि.क्र. ४०/स.सा.क्र. २**</u> देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्याच दिवशी पडताळणी पंचनामा क्र. १ करण्यात आला होता, तो मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला <u>**नि.क्र.४१/स.सा.क्र. २**</u> देण्यात येत आहे.

५. दिनांक २६.०७.२०१३ रोजी सकाळी ९.०० वा. मी परत एसीबी कार्यालयात गेलो. तेथे राठोड साहेब, महल्ले साहेब, कंकाळ साहेब, फिर्यादी तालेवार खान हजर होते. तेथून आम्ही पिंजर साठी गेलो. आम्ही ९.३० वा. निघालो होतो आणि १०.३० वा. पाहोचलो. पिंजर रोडवरील सभागृहामधे आम्ही थांबलो, तेथे मी राठोड यांना फोन लावला. त्यांनी मला मी ठाण्यामधे येतो असे सांगितले. मला फोन नंबर आज आठवत नाही. त्यांनी राठोड साहेबांना फोन केला व मी येतो असे सांगितले. पिंजरच्या पोलीस स्टेशन मधे मी व तक्रारकर्ता थांबलेले होते. त्या वेळेला जमादार राठोड व तालेवार खान यांचे बोलणे झाले. ती व्यक्ती राठोड आहे हे मला फोनमुळे माहीत झाले. त्या वेळेला ते असे बोलले की, ॲट्रोसीटीची केस मधुन तुझे नांव काढतो व तेथे पैश्याची बोलणी झाली. त्यांच्या मधे पाच एक हजाराची बोलणी झाली. तालेवार यांनी साहेबांना ते पैसे द्यायचे होते. त्यानंतर एक दिड वाजता परत

अकोल्याला आलो. त्यानंतर कार्यालयात तालेवार खान आल्यावर झालेले संभाषण लिहून घेण्यात आले. ते संभाषण मी वाचले. ते बरोबर लिहिले होते. तशीच बोलणी झाली होती. त्यावर मी सही केली होती. आता मला दाखविण्यात आलेला पडताळणी पंचनामा क्र. २ तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४२/स.सा.क्र. २** देण्यात येत आहे.  ती कार्यवाही ८.०० वाजेपर्यंत चालली. त्यानंतर मी घरी निघुन गेलो.

**(सरकारी साक्षीदाराच्या तोंडी विनंती वरुन, पुढिल सरतपास पुढिल तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे)**

समक्ष. श्रवणोत्तर स्विकृत

SANGITA RAJKUMAR PAHADE
Digitally signed by SANGITA RAJKUMAR PAHADE
Date: 2026.03.30 16:07:55 +0530

दि.३०.०३.२०२६

(श्रीमती संगिता आर.पहाडे)
अतिरीक्त सत्र न्यायाधीश,अकोला